# बृहन्मुंबई महानगरपालिका
## जनसंपर्क विभाग
## <u>परिपत्रक</u>

**क्रमांक:** पीआरओ/एडिव्ही/१७८२/जी
**दिनांक:** ३१.०१.२०१९

**विषय** : वृत्तपत्रिय जाहिरातीच्या वितरण पध्दतीत बदल करण्याबाबत.
**संदर्भ** : १) परिपत्रक क्र. पीआरओ/एडिव्ही/१२७/जी, दि.०२.०६.२००८.
२) परिपत्रक क्र. पीआरओ/एडिव्ही/३१०/जी, दि. २५.०७.२०११.
३) क्र. पीआरओ/एडिव्ही/२९५/जी, दि.२३.०५.२०१२.
४) परिपत्रक क्र. पीआरओ/एडिव्ही/५८९/जी, दि. २४.१०.२०१७
५) शासन निर्णय क्रमांक :मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४, दि. २०.१२.२०१८
६) मान. मनपा आयुक्तांची मंजूरी क्र. एमजीसी/एफ/८१४८, दि.१५.०१.२०१९

सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की , बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते, विभागांकडून प्राप्त झालेल्या सुचना, निविदा सुचना, पदभरती, जाहिर आवाहन, प्रदर्शनिय, ग्लोबल निविदा इ. च्या जाहिराती जनसंपर्क खात्यामार्फत वृत्तपत्रांना वितरीत करण्यात येतात . सदर जाहिराती वितरण पध्दतीत बदल करण्यासाठी मा. महापालिका आयुक्तांची संदर्भित क्र. ६ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे बदल करण्यात आले आहेत.

- श्रेणीनिहाय (खपनिहाय), भाषानिहाय सर्व जाहिरात वितरीत करणे व छापून आणणे ही सर्वस्वी जबाबदारी जनसंपर्क खात्याची राहिल.

उपरोक्त प्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करणेसाठी जनसंपर्क खात्याद्वारे चक्रीय पध्दतीने भाषा निहाय नि वितरणनिहाय वृत्तपत्रांची नावे ठरविण्यात येतील, त्यांचे दैनंदिन रेकॉर्ड ठेवण्यात येईल.

- पालिकेच्या सर्व विभागांनी जाहिरात वितरण आदेशावर कोणत्याही (विविध भाषिक) वृत्तपत्रांची नावे नमूद न करता जनसंपर्क खात्याकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविणे आवश्यक आहे.
- कोणतेही उद्घाटन / लोकार्पण प्रबोधनात्मक जाहिराती अथवा वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या विशेष कार्यक्रमाच्या प्रदर्शनिय जाहिराती (Display Adds) वितरीत करण्याची जबाबदारी ही जनसंपर्क खात्याची राहिल. मात्र, जनसंपर्क खाते सदर जाहिरातीसंबंधी संबंधित मा. उप-आयुक्त / सह आयुक्त, मा. अति. आयुक्त / मा. महापालिका आयुक्त यांच्या पूर्व मंजूरीने जाहिराती वितरीत करतील.
- जी वृत्तपत्रे शासकिय दर स्विकारतात अश्या वृत्तपत्रांमधून जाहिराती प्रसिध्दीस देण्याकरिता खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त हे प्रशासकिय मंजूरी देतील.
- जाहिरातीची देयके पूर्वी प्रमाणे जनसंपर्क खात्यामध्ये स्विकारुन देयकांच्या अधिदानाबाबतची पुढील कार्यवाही जनसंपर्क खाते करेल. यास्तव, जाहिरात वितरण आदेशावर (वृत्तपत्रांना दयावयाचे पत्र) जनसंपर्क खात्याचा पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

-2-

- संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ४.६.१५ व मुद्दा क्र. ४.६.१६ प्रमाणे मनपा विभागांनी / कार्यालयांनी राज्याबाहेरील वृत्तपत्रांमधून जाहिराती प्रसिध्दीची (वर्गीकृत /दर्शनी जाहिरात) मागणी केल्यास त्यांच्या मागणीनुसार राज्याबाहेरील वृत्तपत्रांमध्ये DAVP च्या दराने तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रांमधून जाहिराती प्रसिध्दीची मागणी केल्यास त्या वृत्तपत्राच्या विशेष दरा संदर्भात जाहिराती वितरणाबाबत संबधीत मा. अति. आयुक्त अंतिम निर्णय घेतील.

- राज्यातील / राज्याबाहेरील आणि काही वेळा आंतरराष्ट्रीय स्तरावर नियतकालिकांमध्ये (दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, आदी प्रकाशने) महापालिकेचा जाहिरातविषयक मजकूर प्रसिध्द करण्याची आवश्यकता असते. या नियतकालिकांसाठी राज्य शासनाचा अथवा केंद्र शासनाचा किंवा कोणत्याही शासकीय संस्थेचा प्रमाणित जाहिरात दर असतोच असे नाही. अशावेळी त्या नियतकालिकांना कोणत्या दराने जाहिरात द्यावी याबाबत परिस्थितीनुसार त्या प्रकाशन संस्थेशी (आंतरराष्ट्रीय प्रकाशनांच्या बाबतीत त्यांच्या भारतातील प्रतिनिधींशी) वाटाघाटी करुन दर निश्चित करण्यात येईल. सर्वसाधारणत: या धोरणात नमूद केलेल्या खपाशी निगडीत दराच्या सूत्राचा मुलभूत आधार तसेच ज्या नियतकालिकाची प्रमाणित वाचक संख्या, वाचकांचा आर्थिक-सामाजिक स्तर या बाबी हा दर ठरविताना विचारात घेणे अपेक्षित असेल. यासंदर्भात मा. अति. आयुक्त अंतिम निर्णय घेतील.

- महापालिका हे कॉस्मोपोलिटीयन शहर असल्याने प्रचलित पध्दतीनुसार सद्यस्थित महापालिका जाहिराती हया मराठी २ वृत्तपत्रे, हिंदी, गुजराती, उर्दू व इंग्रजी या वृत्तपत्रांना प्रत्येकी एक-एक अशाप्रकारे वितरीत करण्यात येतात. त्याच धर्तीवर यापुढेही वृत्तपत्रे जाहिराती प्रसिध्दीसाठी वितरीत करण्यात येतील.

- वृत्तपत्रिय जाहिरात वितरण या व्यतिरिक्त खासगी दूरचित्रवाहिन्या, सिनेमागृहे, दूरदर्शन, आकाशवाणी व खाजगी रेडिओ वाहिन्या या माध्यमांद्वारेही प्रसार व प्रचार करावयाचा असेल तर, संबंधित खात्याने जनसंपर्क विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र, चक्रीय पध्दत (Rotation) अवलंबून वितरण आदेश (Release Order) हे जनसंपर्क खाते देईल.

- जनसंपर्क खात्यामार्फत वृत्तपत्रांना वितरित करण्यासाठी मनपाच्या विविध विभागांच्या जाहिराती प्राप्त होतात. त्या प्रसिद्धीच्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस आधी जनसंपर्क खात्याकडे पाठविणे प्रत्येक मनपा विभागास बंधनकारक राहील. (अपवादात्मक बाबी वगळता).

- जी वर्तमानपत्रे मनपाची जाहिरात ३ वेळा नाकारतील त्या वृत्तपत्रांच्या जाहिराती काही कालावधीकरिता स्थगित करण्याचे अधिकार जनसंपर्क खात्यास राहतील.

- दैनदिन वृत्तपत्रे जाहिराती सर्व प्रचार व प्रसार माध्यमे यांच्या जाहिरातीसाठी येणारा खर्च यापूर्वीप्रमाणे जनसंपर्क खात्याच्या यथायोग्य त्या अर्थशिर्षातून भागविण्यात येईल.

- शासनाकडून वेळोवळी घेण्यात येणाऱ्या निर्णयानुसार मान्यताप्राप्त दरातील बदलानुसार महापालिकेतही सदरप्रमाणे दर स्वीकारणे. तसेच संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयामधील अटी, शर्ती व निकष वृत्तपत्र व नियतकालिकांनी व इतर प्रसार माध्यमांनी पूर्तता करणे बंधनकारक असल्याने संबंधित खात्याने जाहिरात देण्यापूर्वी सदर प्रमाणे पडताळणी करुनच जाहिरात वितरणासाठी जनसंपर्क खात्याकडे पाठवावे.

- **ज्या वृत्तपत्रांचे शासकीय दर व मनपाचे प्रचलित दर यामध्ये दुप्पटीपेक्षा जास्त मात्र तिपटीपेक्षा कमी दर आहेत व ज्या वृत्तपत्रांना शासकिय दर स्वीकारार्ह नाहीत, अश्या वृत्तपत्रांना जाहिरात देण्याकरिता खात्यांनी प्रस्तावांत वृत्तपत्रांां ची नावे नमूद करुन संबंधित अति.आयुक्तांचीी मंजूरी घेणे आवश्यक राहिल .**

- **ज्या वृत्तपत्रांचे जाहिरात दर हे शासकीय दर व मनपाचे प्रचलित दर हे तिपटीपेक्षा जास्त आहेत व ज्या वृत्तपत्रांना शासकिय दर स्वीकाराई नाहीत, अश्या वृत्तपत्रांना जाहिराती देण्याकरिता खात्यांनी प्रस्तावात वृत्तपत्रांची नावे नमूद करुन मान. महानगरपालिका आयुक्तांची मंजूरी घेणे आवश्यक राहिल.**

उपरोक्त निर्देशांची सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख / रुग्णालय अधिष्ठाता / उप.आयुक्त / सह आयुक्त यांनी व्यक्तिशः नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करुनच जनसंपर्क खात्याकडे पुढील कार्यवाहीसाठी जाहिराती पाठविण्यात याव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **०४.०१.२०१९** | **०४.०१.२०१९** | **०४.०१.२०१९** | **१५.०१.२०१९** |
| **(विजय खबाले-पाटील)** | **(सुधीर नाईक)** | **(ए.एल.जऱ्हाड)** | **(अजोय मेहता)** |
| **जनसंपर्क अधिकारी** | **सह आयुक्त (सा.प्र.)** | **अति. आयुक्त (शहर)** | **महापालिका आयुक्त** |

---

**<u>परिपत्रक</u>**

**२०१८-२०१९**

क्रमांक:पीआरओ/एडिव्ही/१७८२/जी, दि. ३१.०१.२०१९

________________________________यांना प्रत (__________ जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

**सही/-**
**३१.०१.२०१९**
**(विजय खबाले-पाटील)**
**जनसंपर्क अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जनसंपर्क विभाग

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या यादीवरील वृत्तपत्रे

**अ वर्ग वृत्तपत्र**

| अनु .क्र. | वृत्तपत्राचे नांव | वर्ग | वितरण | शासनाचे नवीन सूत्रानुसार दर (DGI&PR) | २५ वर्षानिमित्त अतिरिक्त रु. २/- दर | शासन / मनपाचे नवीन दर | रंगीत जाहिरातीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र टाइम्स (म) | अ | 270780 | 132 | 2 | 134 | 187.60 |
| 2 | लोकसत्ता (म) | अ | 268539 | 131 | 2 | 133 | 186.20 |
| 3 | लोकमत (म) | अ | 126334 | 81 | 0 | 81 | 113.40 |
| 4 | सकाळ (म) | अ | 102923 | 73 | 0 | 73 | 102.20 |
| 5 | सामना (म) | अ | 101537 | 72 | 0 | 72 | 100.80 |
| 6 | नवाकाळ (म) | अ | 295634 | 140 | 2 | 142 | 198.80 |
| 7 | संध्याकाळ (म) | अ | 106419 | 74 | 2 | 76 | 106.40 |
| 8 | मुंबई चौफेर (म) | अ | 251503 | 125 | 0 | 125 | 175.00 |
| 9 | आपला वार्ताहर (म) | अ | 125197 | 81 | 0 | 81 | 113.40 |
| 10 | प्रहार (म) | अ | 132000 | 83 | 0 | 83 | 116.20 |
| 11 | पुढारी (म) | अ | 103354 | 73 | 0 | 73 | 102.20 |
| 12 | संध्यानंद (म) | अ | 63000 | 55 | 0 | 55 | 77.00 |
| 13 | नवभारत टाइम्स (हिं) | अ | 163433 | 94 | 2 | 96 | 134.40 |
| 14 | नवभारत (हिं) | अ | 275000 | 133 | 0 | 133 | 186.20 |
| 15 | यशोभूमी (हिं) | अ | 122634 | 80 | 0 | 80 | 112.00 |
| 16 | हमारा महानगर (हिं) | अ | 108259 | 75 | 0 | 75 | 105.00 |
| 17 | प्रात:काल (हिं) | अ | 137000 | 85 | 0 | 85 | 119.00 |
| 18 | जागरुक टाइम्स (हिं) | अ | 157000 | 92 | 0 | 92 | 128.80 |
| 19 | दबंग दुनिया (हिं) | अ | 72000 | 59 | 0 | 59 | 82.60 |
| 20 | खबरे आज तक (हिं) | अ | 72000 | 59 | 0 | 59 | 82.60 |
| 21 | मिड-डे (इं) | अ | 225000 | 116 | 2 | 118 | 165.20 |
| 22 | इकॉनॉमिक टाइम्स (इं) | अ | 237323 | 120 | 2 | 122 | 170.80 |
| 23 | फ्रि प्रेस जर्नल (इं) | अ | 78000 | 62 | 2 | 64 | 89.60 |
| 24 | मुंबई मिरर (इं) | अ | 200000 | 107 | 0 | 107 | 149.80 |
| 25 | एशियन एज (इं) | अ | 51000 | 50 | 0 | 50 | 70.00 |
| 26 | गुजरात समाचार (गु) | अ | 200910 | 107 | 0 | 107 | 149.80 |
| 27 | मुंबई समाचार (गु) | अ | 115599 | 77 | 2 | 79 | 110.60 |
| 28 | मिड-डे (गु) | अ | 80000 | 63 | 0 | 63 | 88.20 |
| 29 | इन्कलाब (उर्दू) | अ | 53000 | 51 | 0 | 51 | 71.40 |

# ब वर्ग वृत्तपत्र

| अनु. क्र. | वृत्तपत्राचे नांव | वर्ग | वितरण | शासनाचे नवीन सूत्रानुसार दर (DGI&PR) | २५ वर्षानिमित्त अतिरिक्त रु. २/- दर | शासन / मनपाचे नवीन दर | रंगीत जाहिरातीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | पुण्यनगरी (म) | ब | 43798 | 46 | 0 | 46 | 64.40 |
| 31 | वृत्तरत्न सम्राट (म) | ब | 26000 | 36 | 0 | 36 | 50.40 |
| 32 | रत्नागिरी टाइम्स (म) | ब | 20800 | 33 | 0 | 33 | 46.20 |
| 33 | आपलं महानगर (म) | ब | 37000 | 42 | 0 | 42 | 58.80 |
| 34 | वृत्तमानस (म) | ब | 40500 | 44 | 0 | 44 | 61.60 |
| 35 | मुंबई लक्षदीप (म) | ब | 37200 | 42 | 0 | 42 | 58.80 |
| 36 | प्रत्यक्ष (म) | ब | 21000 | 34 | 0 | 34 | 47.60 |
| 37 | मुंबई मित्र (म) | ब | 23000 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 38 | बहुजनरत्न लोकनायक (म) | ब | 25500 | 36 | 0 | 36 | 50.40 |
| 39 | मुंबई तरुण भारत (म) | ब | 49000 | 49 | 0 | 49 | 68.60 |
| 40 | मुंबई माणूस (म) | ब | 26500 | 36 | 0 | 36 | 50.40 |
| 41 | नवशक्ती (म) | ब | 31000 | 39 | 2 | 41 | 57.40 |
| 42 | सांज महानगरी (म) | ब | 21000 | 34 | 0 | 34 | 47.60 |
| 43 | नवराष्ट्र (म) | ब | 40000 | 44 | 0 | 44 | 61.60 |
| 44 | दोपहर का सामना (हिं) | ब | 47800 | 48 | 0 | 48 | 67.20 |
| 45 | दो बजे दोपहर (हिं) | ब | 23000 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 46 | आज का आंनद (हिं) | ब | 42000 | 45 | 0 | 45 | 63.00 |
| 47 | निष्पक्ष जनसंसार (हिं) | ब | 23000 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 48 | बिझनेस स्टॅन्डर्ड (इं) | ब | 33439 | 40 | 0 | 40 | 56.00 |
| 49 | आफ्टरनून व्हॉईस (इं) | ब | 21300 | 34 | 0 | 34 | 47.60 |
| 50 | एब्सल्युट इंडिया (इं) | ब | 23000 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 51 | दिव्यभास्कर (गु) | ब | 23710 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 52 | जन्मभूमी (गु) | ब | 41000 | 45 | 2 | 47 | 65.80 |
| 53 | उर्दू टाइम्स (उर्दू) | ब | 20923 | 33 | 2 | 35 | 49.00 |
| 54 | कला कौमुदी (मल्याळम) | ब | 24000 | 35 | 0 | 35 | 49.00 |
| 55 | दै.मराठीया मुरासु (तामिळ) | ब | 21000 | 34 | 0 | 34 | 47.60 |
| 56 | दै. तंथी (तामिळ) | ब | 20752 | 33 | 0 | 33 | 46.20 |
| 57 | दै.कर्नाटकमल्ला (कन्नड) | ब | 27588 | 37 | 0 | 37 | 51.80 |

## क वर्ग वृत्तपत्र

| अनु. क्र. | वृत्तपत्राचे नांव | वर्ग | वितरण | शासनाचे नवीन सूत्रानुसार दर (DGI&PR) | २५ वर्षानिमित्त अतिरिक्त रु. २/- दर | शासन / मनपाचे नवीन दर | रंगीत जाहिरातीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 58 | कोकण सकाळ (म) | क | 10200 | 23 | 0 | 23 | 32.20 |
| 59 | शिवनेर (म) | क | 10000 | 23 | 2 | 25 | 35.00 |
| 60 | आपलं साजं सहयाद्री टाइम्स (म) | क | 13000 | 26 | 0 | 26 | 36.40 |
| 61 | तहलका समाचार (म) | क | 10500 | 23 | 0 | 23 | 32.20 |
| 62 | जनतेचा महानायक (म) | क | 15000 | 28 | 0 | 28 | 39.20 |
| 63 | लोकमंथन (म) | क | 17650 | 30 | 0 | 30 | 42.00 |
| 64 | जनप्रवास (म) | क | 15000 | 28 | 0 | 28 | 39.20 |
| 65 | द ग्लोबल टाइम्स (म) | क | 8900 | 21 | 0 | 21 | 29.40 |
| 66 | जनतेचा सत्यवार्ता (म) | क | 5500 | 18 | 0 | 18 | 25.20 |
| 67 | प्रात:काल (म) | क | 12600 | 25 | 0 | 25 | 35.00 |
| 68 | तुफान लोकशाही (म/हिं) | क | 5100 | 18 | 0 | 18 | 25.20 |
| 69 | विश्वपथ (म) | क | 3200 | 16 | 0 | 16 | 22.40 |
| 70 | तरुण भारत संवाद (म) | क | 7100 | 20 | 0 | 20 | 28.00 |
| 71 | देश मोर्चा (म) | क | 6100 | 19 | 0 | 19 | 26.60 |
| 72 | मुंबई दैनिक संध्या (हिं) | क | 10000 | 23 | 0 | 23 | 32.20 |
| 73 | मुंबई मित्र (हिं) | क | 9001 | 22 | 0 | 22 | 30.80 |
| 74 | मुंबई हलचल (हिं) | क | 11000 | 24 | 0 | 24 | 33.60 |
| 75 | राष्ट्रीय अधिकार (म/हिं) | क | 5100 | 18 | 0 | 18 | 25.20 |
| 76 | सिध्दांत समाचार(हिं) | क | 5100 | 18 | 0 | 18 | 25.20 |
| 77 | पुर्णविराम (हिं) | क | 16000 | 29 | 0 | 29 | 40.60 |
| 78 | मिलेनियम न्युज टेक (हिं) | क | 5600 | 18 | 0 | 18 | 25.20 |
| 79 | आफ्टरनून (इं) | क | 8000 | 21 | 0 | 21 | 29.40 |
| 80 | मुंबई फेस (इं) | क | 6100 | 19 | 0 | 19 | 26.60 |
| 81 | हिंदुस्थान (उर्दू) | क | 19500 | 32 | 2 | 34 | 47.60 |
| 82 | सहाफत (उर्दू) | क | 17500 | 30 | 0 | 30 | 42.00 |
| 83 | अवधनामा (उर्दू) | क | 15000 | 28 | 0 | 28 | 39.20 |
| 84 | मुंबई उर्दू न्युज (उर्दू) | क | 12000 | 25 | 0 | 25 | 35.00 |
| 85 | हिंदू (सिंधी) | क | 15000 | 28 | 0 | 28 | 39.20 |
| 86 | इनाडू (तेलगू) | क | 10022 | 23 | 0 | 23 | 32.20 |
| 87 | दिनकरन (तामिळ) | क | 19494 | 32 | 0 | 32 | 44.80 |

## 'अ' व 'ब'वर्ग वृत्तपत्रे

**खालील तक्त्यात नमूद अनु.क्र. १ ते ५ या वृत्तपत्रांना शासकिय दर स्वीकाराई नाहीत, या वृत्तपत्रांना जाहिराती देण्याकरिता प्रस्तावात वृत्तपत्रांची नावे नमूद करुन मा. महानगरपालिका आयुक्तांची मंजूरी आवश्यक आहे.**

| अनु. क्र. | वृत्तपत्राचे नांव | वर्ग | वितरण | शासनाचे नवीन सूत्रानुसार दर (DGI&PR) | २५ वर्षानिमित्त अतिरिक्त रु. २/- दर | शासनाचे नवीन दर | मनपाचे प्रचलित दर (चौ.से.मी.) | रंगीत जाहिरातीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **टाइम्स ऑफ इंडिया(इं)** | अ | 737341 | 295 | 2 | 297 | **1200** | **1680** |
| 2 | **इंडियन एक्सप्रेस (इं)** | अ | 82146 | 64 | 2 | 66 | **325** | **650** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | **डि.एन.ए. (इं)** | अ | 310000 | 146 | 0 | 146 | **450** | **450** |
| 4 | **हिंदुस्थान टाइम्स (इं)** | अ | 240000 | 121 | 0 | 121 | **350** | **450** |
| 5 | **द. हिंदू (इं)** | ब | 42176 | 45 | 0 | 45 | **150** | **300** |

**सही/-**
**३१.०१.२०१९**
**(विजय खबाले-पाटील)**
**जनसंपर्क अधिकारी**